सहायक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा

StudentBounty.com

**A**

परीक्षा दि. 27 ऑगस्ट 2011

Code : **RVM**

पेपर क्र. : 2

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET No. 200577

# प्रश्नपत्रिका क्र. 2

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग/मंत्रालय येथे चालणाऱ्या कार्यालयीन कामकाजाचे ज्ञान व पद्धती

**वेळ : 2½ (अडीच) तास**

**एकूण प्रश्न : 150**

**एकूण गुण : 300**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 150 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

ब) **मंत्रालयातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांनी विभाग – "अ" आणि विभाग – "ब" सोडविणे आवश्यक आहे आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांनी विभाग – "अ" आणि विभाग – "क" सोडविणे आवश्यक आहे.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

**SEAL**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

कच्च्या कामासाठी जागा

www.StudentBounty.com

StudentBounty.com

## विभाग – अ

1. सेवा विषयक किंवा विद्याविषयक मानविशेष नसलेला असा कोणताही ______________ राज्याकडून प्रदान केला जाणार नाही.
   (1) सन्मान (2) पुरस्कार (3) किताब (4) यापैकी कोणताही नाही

2. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 17 अन्वये खालील बाबी संदर्भात तरतूद नमुद केली आहे
   (1) अस्पृश्यता नष्ट करणे (2) कायद्यापुढे समानता
   (3) किताब नष्ट करणे (4) कारखाने इत्यादींमध्ये बालकांना कामाला ठेवण्यात मनाई

3. जिवित व व्यक्तीगत स्वातंत्र्य यांचे संरक्षण मिळण्याचा हक्क भारतीय संविधानाच्या या अनुच्छेदात नमुद आहे
   (1) 17 (2) 19 (3) 21 (4) 23

4. ______________ वर्षे वयाखालील कोणत्याही बालकास कोणत्याही कारखान्यात वा रवाणीत काम करण्यासाठी नोकरीत ठेवले जाणार नाही अथवा अन्य कोणत्याही धोक्याच्या कामावर त्यास लावले जाणार नाही.
   (1) तेरा (2) चौदा (3) पंधरा (4) बारा

5. भारतीय संविधानातील नागरिकांच्या स्वातंत्र्याच्या हक्कांत खालील नमुद हक्कांचा अंतर्भाव नाही
   (1) मालमत्ता संपादन करण्याचा
   (2) भाषा व अभिव्यक्तीचा
   (3) भारतात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचा
   (4) कोणताही पेशा अथवा व्यवसाय व्यापार चालवण्याचा

6. विवक्षित प्राधिलेख काढण्याचे उच्च न्यायाकडचे अधिकारावर भाग सहा राज्ये अनुच्छेद ______________ मध्ये अंतर्भूत केले आहेत.
   (1) कलम 226 (2) कलम 17 (3) कलम 18 (4) अनुच्छेद 50

7. ज्याचे उत्पन्न एखाद्या विशिष्ठ धर्माचे अथवा धार्मिक संप्रदायाचे संवर्धन करण्यासाठी किंवा तो चालू ठेवण्यासाठी विनिर्दिष्टपणे विनियोजन केलेले आहे असे कोणतेही _______ देण्याची कोणत्याही व्यक्तीवर सक्ती केली जाणार नाही.
   (1) कर (2) शुल्क (3) वर्गणी (4) यापैकी कोणतेही नाही

8. राज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही क्षेत्रांमध्ये शासकीयसेवेत मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची तरतूद भारतीय संविधानाच्या ______________ अनुच्छेदान्वये करण्यात येते.
   (1) 14 (2) 15 (3) 16 (4) 17

9. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 17 अन्वये खालील तरतूद करण्यात आली आहे
   (1) किताब नष्ट करणे (2) सार्वजनिक सेवायोजनाच्या बाबींमध्ये समान संधी
   (3) कायद्यापुढे समानता (4) अस्पृश्यता नष्ट करणे

10. खालील निकषानुसार अल्पसंख्यांक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्याचे प्रशासन करण्याचा हक्क असेल
   (1) धर्म किंवा जात (2) धर्म किंवा भाषा
   (3) धर्म वंश, जात किंवा भाषा (4) यापैकी नाही

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

11. भारतीय संविधानाच्या या तरतूदी मूळे स्त्रीयां करिता विशेष तरतूद करण्यास राज्यास मुभा देण्यात आ

(1) 15 (1) (2) 15 (2) (3) 15 (3) (4) 15 (4)

12. धर्मस्वातंत्र्याचा अधिकार भारतीय संविधानाच्या ______________ या अनुच्छेदांमध्ये स्पष्ट करण्यात आला अ

(1) अनुच्छेद 25 ते 28
(2) अनुच्छेद 23 व 24
(3) अनुच्छेद 29 व 30
(4) अनुच्छेद 14 ते 18

13. नागरिकांना भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र एकरूप नागरीसंहीता लाभावी यासाठी राज्य प्रयत्नशिल राहील अशी तरतूद राज्य धोरणाच्या निदेशक तत्वांत ______________ या अनुच्छेदात नमुद आहे.

(1) अनुच्छेद - 40
(2) अनुच्छेद - 42
(3) अनुच्छेद - 44
(4) अनुच्छेद - 46

14. धार्मिक संप्रदायास अथवा त्यांच्यापैकी कोणत्याही गटास, कोणत्या बाबीस अधीन राहून धार्मिक संस्था स्थापन करणे व स्वखर्चाने चालविणे याबाबत घटनेत तरतूद आहे

(1) सार्वजनिक सुव्यवस्था
(2) नीतिमत्ता
(3) आरोग्य
(4) वरीलपैकी सर्व

15. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 40 अन्वये खालील तरतूद करण्यात आली आहे

(1) ग्रामपंचायतीचे विघटन
(2) ग्रामपंचायतीचे संघटन
(3) ग्रामपंचायतीचे संशोधन
(4) यापैकी नाही

16. संविधानातील राज्य धोरणांची निदेशक तत्वे या मध्ये राज्याने अनुसरावयाच्या धोरणाची विवक्षित तत्वे अनुच्छेद __________ मध्ये नमूद करण्यात आली आहेत.

(1) 37 (2) 38 (3) 39 (4) 39 क

17. राज्य धोरणांची निदेशक तत्वे संदर्भात खालील पैकी कोणते विधान बरोबर आहे ?

अ) सदर तत्वे न्यायालयाकरवी अंमलबजावणी करणे योग्य असणार नाही

ब) फलोत्पादन व फळप्रक्रीया उद्योगात निर्यातित चालना देणे

(1) अ (2) ब (3) अ व ब (4) यापैकी नाही

18. भारतीय नागरिक नसलेली व्यक्ति, ती राज्याच्या नियंत्रणाखालील कोणतेही लाभाचे किंवा विश्वासाचे पद धारण करत असताना कोणाच्या संमतीशिवय कोणत्याही परकीय देशाकडून कोणताही किताब स्वीकारणार नाही, अशी घटनेत तरतूद आहे.

(1) पंतप्रधान (2) लोकसभा (3) राष्ट्रपती (4) उपराष्ट्रपती

19. राज्य धोरणाच्या निदेशक तत्वात या पैकी पर्यायाचा समावेश नाही

अ) राज्य लोकसहाय्याचा हक्क उपलब्द करून देण्यासाठी प्रयत्नशिल असेल

ब) सर्वत्र एकरूप नागरी संहीता लाभावी या साठी प्रयत्नशिल राहील

क) राज्य मोफत व सक्तीचे शिक्षण सर्व वयोगटासाठी देण्यासाठी प्रयत्नशिल राहील

(1) अ (2) ब (3) क (4) यापैकी नाही

कच्च्या कामासाठी जागा

www.StudentBounty.com

StudentBounty.com

20. मूलभूत कर्तव्ये यात कोणत्या बाबींचा समावेश आहे ?
    (1) संविधानाचे पालन करणे
    (2) नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करणे
    (3) पालकाने पाल्यास सहा ते चौदा वर्षापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करणे
    (4) वरीलपैकी सर्व

21. बालकांचे सहा वर्षा पर्यंत संगोपन करण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठी तरतूद खालील पैकी कशात नमुद आहे ?
    (1) मूलभूत हक्क (2) निदेशक तत्वे (3) मूलभूत कर्तव्य (4) प्रस्तावनेत

22. मूलभूत कर्तव्यां बाबत खालील पैकी कोणते विधान सत्य आहे ?
    अ) भारताची सार्वभौमकता एकता व एकात्मता उन्नत ठेवणे
    ब) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे
    क) पालकाने पाल्यास सहाव्या वर्षापासून ते चौदव्या वर्षापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्द करून देणे
    ड) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद यांचा विकास करणे
    (1) अ, ब (2) अ, ब, क (3) ब, क (4) सर्व बरोबर

23. घटनेच्या भाग चार मध्ये कोणता विषय समाविष्ट आहे ?
    (1) मूलभूत हक्क (2) संघराज्य
    (3) राज्यधोरणांची निदेशक तत्वे (4) नागरिकत्व

24. मूलभूत कर्तव्यां मध्ये याचा समावेश केलेला आहे
    अ) देशाचे संरक्षण
    ब) सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण
    क) विज्ञान निष्ठ दृष्टिकोन
    ड) संस्कृतीचा समृद्ध वारसा जतन करणे
    (1) अ, ब, क (2) अ, क, ड
    (3) ब, क, ड (4) वरीलपैकी सर्व

25. संविधानातील स्वातंत्र्याचा हक्क या मध्ये विवक्षित प्रकरणी अटक व स्थानबद्धता या पासून संरक्षण देण्याची तरतूद अनुच्छेद ____________ अन्वये करण्यात आली आहे.
    (1) 20 (2) 21 (3) 21 क (4) 22

26. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 कोणत्या दिनांकापासून अंमलात आले आहेत ?
    (1) 21 जुलै, 1979 (2) 12 जुलै, 1979
    (3) 1 जुलै, 1979 (4) 31 जुलै, 1979

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

**27.** महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या संदर्भात शासन शुद्धिपत्रक दिनांक 2 सप्टेंबर, कुटुंबाच्या व्याख्येत कोणत्या व्यक्तीचा समावेश होतो ?

(1) सक्षम न्यायालयाच्या हुकूमनाम्याद्वारे शासकीय-कर्मचाऱ्यापासून विभक्त झालेली पत्नी किंवा यथास्थिती

(2) शासकीय कर्मचाऱ्याकडून कोणत्याही कायद्याद्वारे ज्याची अभिरक्षा काढून घेण्यात आलेली आहे असा मुलगा किंवा मुलगी

(3) शासकीय कर्मचाऱ्यासोबत रहात नसलेली त्याची पत्नी किंवा यथास्थिती पती

(4) शासकीय कर्मचाऱ्यावर अवलंबून नसणारी त्याची सावत्र मुलगी किंवा सावत्र मुलगा

---

**28.** खालीलपैकी कोणती बाब स्वेच्छेने शासकीय कर्मचारी शासनाच्या पूर्वमंजूरीशिवाय करु शकेल ?

(1) व्यापारात किंवा उद्योगधंद्यात गुंतवणूक
(2) निदर्शने आणि संप
(3) राजकारण आणि निवडणुका
(4) ध्वजनिधी वर्गणी

---

**29.** महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या संदर्भातील शासन अधिसूचना दिनांक 4 जून, 2008 अनुसार शासकीय कर्मचारी कर्तव्य पार पाडीत असताना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कोणत्या नियमानुसार अर्जदारास माहिती देवू शकेल ?

(1) 2005 चा 19 (2) 2005 चा 22 (3) 2005 चा 25 (4) 2005 चा 31

---

**30.** कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यास कोणत्या प्रकारच्या लेखन किंवा भाषणासाठी शासनाच्या मंजूरीची आवश्यकता नाही ?

(1) शासनाच्या चालू किंवा अलिकडच्या धोरणावर टीका करणारे लेखन किंवा भाषण

(2) शासन व केंद्र शासन यांच्यातील हितसंबंधांना बाधा आणणारे लेखन किंवा भाषण

(3) साहित्यिक, कलात्मक किंवा वैज्ञानिक स्वरूपाचे लेखन किंवा भाषण

(4) शासकीय कर्मचाऱ्याची व्यक्तिगत गाऱ्हाणी पुढे मांडली जातील असे लेखन किंवा भाषण

---

**31.** रफिक या शासकीय कर्मचाऱ्याच्या मुलाला शासनाला संगणक विषयक सेवा पुरविणाऱ्या खाजगी कंपनीत नोकरीची संधी आली. मुलगा नोकरी स्वीकारण्यास इच्छुक आहे, याबाबत खालील पर्याय पहावेत

(अ) मुलाने तात्काळ नोकरी स्वीकारावी

(ब) रफिकने याबाबत शासनाकडे पूर्वपरवानगी मागावी

(क) शासनाची मंजूरी न आल्यास नोकरी स्वीकारू नये व स्वीकारलेली नोकरी सोडावी

(ड) शासनाकडून लगेच मंजूरी मिळवणे शक्य नसल्यास, तात्पुरती नोकरी स्वीकारावी

कोणते पर्याय योग्य ठरतील ?

(1) सर्व (2) ब, क, ड (3) अ, ब, क (4) अ, क, ड

---

**32.** महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या संदर्भात शासकीय अधिसूचना दिनांक 11 एप्रिल, 2008 अनुसार गट 'अ' चे कोणतेही पद धारण करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याने धार्मिक समारंभाच्या वेळी नातेवाईकाकडून स्विकारलेल्या किती देणगी मूल्याबाबत शासनास कळविणे आवश्यक आहे ?

(1) रु. 2,000/- पेक्षा जास्त
(2) रु. 4,000/- पेक्षा जास्त
(3) रु. 7,000/- पेक्षा जास्त
(4) रु. 10,000/- पेक्षा जास्त

---

**33.** शासकीय कर्मचाऱ्यास प्रसार माध्यमांशी संपर्क ठेवण्यास प्रतिबंध करण्याबाबत तरतुद म.ना.से. (वर्तणूक) अधिनियमाच्या ____________ अन्वये करण्यात आली आहे.

(1) कलम - 9
(2) कलम - 7
(3) कलम - 11
(4) कलम - 16

---

कच्च्या कामासाठी जागा

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**34.** शासकीय कर्मचारी कोणत्याही सेवेत किंवा पदावर प्रथम नियुक्ती झाल्यावर आणि शासन विनिर्दिष्ट करील ते नमुन्यात ________ व ________ विवरणपत्र सादर करील.

(1) मत्ता व दायित्वाचे (2) जात व धर्माचे
(3) अनुभव व कार्याचे (4) वरीलपैकी नाही

**35.** गट 'क' किंवा गट 'ड' च्या कर्मचाऱ्यांपैकी कोणत्याही संवर्गातील शासकीय कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या नियम 19 पोटनियम 4 खेरीज कोणत्याही तरतूदीतून वगळण्यासाठी कोणत्या विभागाच्या सहमतीची आवश्यकता आहे ?

(1) विधी व न्याय विभाग (2) वित्त विभाग
(3) सामान्य प्रशासन विभाग (4) संबंधित प्रशासकीय विभाग

**36.** महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 मधील नियमाच्या प्रयोजनार्थ "जंगम मालमत्ता" या संज्ञेत कोणाचा समावेश होत नाही ?

(1) जडजवाहीर ज्यांचा वार्षिक हप्ता रु. 10,000/- हून अधिक आहे अशा विमापत्रांची रक्कम
(2) शासकीय कर्मचाऱ्यांनी काढलेली कर्जे
(3) मोटारगाड्या, मोटार सायकली इ. वाहने व रेडिओं, रेफ्रिजरेटर, टेलिव्हिजन सेट
(4) भाड्याचे किंवा मालकीचे निवासस्थान

**37.** कोणताही शासकीय कर्मचारी किंवा त्याच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीचे नाव कोणत्या वास्तूला देण्याकरीता शासनाची पूर्वसंमती घेण्याची आवश्यकता नाही ?

(1) ग्रंथालय (2) रूग्णालय (3) शाळा (4) निवासस्थान

**38.** शासकीय कर्मचाऱ्याने कोणत्या व्यक्तीशी विवाह केल्यास शासनास तात्काळ कळविणे आवश्यक आहे ?

(1) ज्याचा जीवनसाथी हयात आहे अशी व्यक्ती
(2) शासकीय कर्मचाऱ्याचा जीवनसाथी हयात असताना अन्य व्यक्ती
(3) भारतीय नागरिक नसलेली व्यक्ती
(4) शासकीय सेवेत असलेली व्यक्ती

**39.** शासकीय कर्मचाऱ्यांच्या संदर्भात खालील विधाने पहावीत

(अ) तो कार्यालयीन वेळेनंतर स्वतःचा धंदा करु शकतो
(ब) तो सुटिच्या दिवशी स्पर्धापरीक्षा मार्गदर्शनाचे मानसेवी काम करु शकतो
(क) तो कुटुंबियांच्या धंद्याचे विजिटिंग कार्ड त्याच्याकडे शासकीय कामानिमित येणाऱ्या अभ्यागतांना देऊ शकतो
(ड) निवृत्तीनंतर जेथे वाणिज्यिक नोकरी करायची आहे, त्यांचेशी निवृत्तीपूर्वी वाटाघाटी करु शकतो
म. ना. से.(वर्तणूक) नियम, 1979 अन्वये

(1) अ, ब, ड बरोबर (2) क, ड बरोबर
(3) केवळ ब बरोबर (4) अ, ब बरोबर

**40.** महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या संदर्भात शासकीय अधिसूचना दिनांक 1 डिसेंबर, 1997 अनुसार कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यास त्याचे घरगुती किंवा इतर कोणतेही काम करण्यासाठी किती वर्षाखालील मुलांना नोकरीस ठेवण्यास प्रतिबंध आहे ?

(1) 13 वर्षे (2) 14 वर्षे (3) 15 वर्षे (4) 16 वर्षे

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com



41. शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनेला मान्यता मिळण्यासाठी करावयाच्या अर्जासोबत अशा संघटनेच्या स्था[illegible]त विनियमित करणाऱ्या नियमांच्या (संघटना नियम) किती प्रती जोडणे आवश्यक आहे ?
(1) दोन प्रती (2) तीन प्रती (3) पाच प्रती (4) सहा प्रती

42. खालील विधाने पहावीत
अ) शासकीय कर्मचाऱ्याला तसबीर काढून घेता येईल व ती भेट म्हणून स्वीकारता येणार नाही
ब) जीवनसाथी हयात असतानांही शासकीय कर्मचारी शासनाच्या पूर्व परवानगीने दुसरा विवाह करु शकेल म. ना. से. (वर्तणूक) नियम, 1971, अन्वये
(1) केवळ 'अ' बरोबर (2) केवळ 'ब' बरोबर
(3) दोन्ही बरोबर (4) दोन्ही चूक

43. म. ना. से. (वर्तणूक) नियम, 1979 तील नियमांच्या संबंधात प्रश्न उपस्थित राहिल्यास, अंतिम निर्णय कोणाचा असेल ?
(1) शासनाचा (2) महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरणाचा (MAT)
(3) उच्च न्यायालयाचा (4) सर्वोच्च न्यायालयाचा

44. शासकीय कर्मचाऱ्यांच्या (औद्योगिकेतर) संघटनेच्या बाबतीत खालीलपैकी कोणते विधान अचूक आहे ?
(1) याबाबतच्या शर्ती म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 मधील नियम 31 मध्ये नमूद आहेत
(2) शासन एका वेळी एकाच वर्गाच्या एकापेक्षा जास्त संघटनांना मान्यता देऊ शकते
(3) संघटनेचे लाभ मिळविण्यासाठी शासकीय कर्मचारी हा त्या संघटनेचा किमान 1 वर्ष सदस्य असला पाहिजे
(4) संघटनेच्या लेखापुस्तकांची तपासणी संघटनेचा कोणताही सदस्य करु शकतो

45. म.ना.से. (वर्तणुक) नियम 1979 च्या कलम (8) मध्ये खालीलपैकी कोणत्या विषयाची तरतूद आहे ?
(1) निदर्शने आणि संघ (2) राजकारण आणि निवडणुका यामध्ये सहभागी होणे
(3) अभिदान (वर्गणी) (4) कार्यालयीन माहिती पुरविणे

46. शासकीय औद्योगिकेतर कर्मचाऱ्यांच्या विशिष्ट वर्गाचा समावेश असणाऱ्या संघटनेचे सदस्यत्व त्या वर्गाच्या प्रत्येक शासकिय औद्योगिकेतर कर्मचाऱ्यांना कसे असले पाहिजे ?
(1) बंधनकारक (2) कायम (3) खुले (4) सक्तीचे

47. शासकिय कर्मचाऱ्यांच्या संघटनेला मान्यता देण्याकरीता असलेल्या शर्तीनुसार अशी संघटना कोणशी संबंधित असता कामा नये ?
(1) कोणतीही सामाजिक संस्था (2) कोणतीही राजकीय संघटना
(3) कोणतीही स्थानिक संघटना (4) कोणतीही शैक्षणिक संस्था

48. शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनेला मान्यता मिळण्यासाठी सादर केलेल्या अर्जासोबतच्या "संघटना नियमांना" कोणाची मान्यता मिळणे आवश्यक आहे ?
(1) मा.उच्छ न्यायालय (2) महाराष्ट्र लोकसेवा आयोग
(3) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (4) शासन

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

49. शासनाने एका संघटनेला मान्यता दिल्यानंतर, त्याच वर्गाच्या अन्य शासकीय औद्योगिकेतर कर्मचाऱ्यांच्या मान्यतेसाठी अर्ज केल्यास अगोदरच्या संघटनेला मान्यता दिल्याच्या तारखेपासून किती कालावधीनंतर अशा अ… विचार केला जाईल ?
(1) 6 महिने पूर्ण झाल्यानंतर (2) 1 वर्ष पूर्ण झाल्यानंतर
(3) $1^1/_2$ वर्षे पूर्ण झाल्यानंतर (4) 2 वर्षे पूर्ण झाल्यानंतर

50. कोणतीही मान्यताप्राप्त संघटना आपले पदाधिकारी म्हणून कोणत्या व्यक्तीची नियुक्ती करू शकणार नाही ?
(1) सेवानिवृत्त व्यक्ती (2) पदाधिकारी पदावरील कार्यरत व्यक्ती
(3) सदस्येतर व्यक्ती (4) कार्यमुक्त व्यक्ती

51. वेतन म्हणजे शासकीय कर्मचाऱ्याला दरमहा मिळणारे
(1) त्याने धारण केलेल्या कायम किंवा स्थानापन्न पदाकरीता मंजुर झालेले वेतन
(2) वैयक्तिक वेतन व विशेष वेतन
(3) शासनाकडून वेतन म्हणून खास वर्गीकृत करण्यांत येईल अशी अन्य कोणतीही वित्तलब्धी
(4) वरील सर्व

52. कोणत्याही प्रकरणी अन्यथा स्पष्टपणे तरतुद केली नसेल तर, शासकीय कर्मचाऱ्याचा संपूर्ण वेळ _________ सेवेसाठी असतो.
(1) कुटुंबाच्या (2) शासनाच्या (3) नातेवाईकांच्या (4) सावकारांच्या

53. विशेष जिकीरीच्या स्वरूपाची कर्तव्ये, कामामध्ये किंवा जबाबदारीमध्ये विशिष्ट वाढ यामुळे एखाद्या पदाच्या अथवा शासकीय कर्मचाऱ्याच्या वित्तलब्धीत वेतनाच्या स्वरूपात दिलेली वाढ म्हणजे _________ होय.
(1) रजा वेतन (2) स्थानिक भत्ता (3) पूरक भत्ता (4) विशेष वेतन

54. एखाद्या व्यक्तीने शासनातील कोणतेही पद पुर्वी धारण केलेले असले तरीही, सध्या कोणतेही शासकीय पद धारण करीत नसताना त्या व्यक्तीची केलेली नियुक्ती म्हणजे _________ होय.
(1) पहिली नियुक्ती (2) सावधि-नियुक्ती
(3) स्वीयेत्तर सेवा (4) निवड श्रेणी

55. म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 च्या कलम (38) अंतर्गत सूचनांमध्ये बदल खालील कोणत्या दिनांकाच्या अधिसुचनेअन्वये करण्यात आला ?
(1) 24 डिसेंबर 2008 (2) 1 डिसेंबर 2009
(3) 24 डिसेंबर 2010 (4) यापैकी नाही

56. संविधान म्हणजे काय ?
(1) राज्याचे संविधान (2) भारताचे संविधान
(3) राज्यपालांचे संविधान (4) राष्ट्रपतींचे संविधान

57. कर्तव्यामध्ये कोणत्या बाबी समाविष्ट नसतात ?
(1) परिविक्षाधीन म्हणून केलेली सेवा (2) पदग्रहण अवधी
(3) शासनाने प्राधिकृत केलेला निदेशन पाठ्यक्रम (4) शासन सेवेचा राजीनामा देवून नंतर केलेली सेवा

कच्च्या कामासाठी जागा



www.StudentBounty.com

StudentBounty.com

**58.** महाराष्ट्र लेखा लिपिकांच्या परिक्षेला बसण्यासाठी आवश्यक असलेला कालावधी व परिक्षेला जाण्यासाठी आवश्यक असलेल्या कालावधीला कर्तव्य कालावधी समजण्याची सवलत किती पेक्षा अधिक वेळ देण्यात ये

(1) एक (2) दोन (3) तीन (4) चार

---

**59.** शासकीय कर्मचाऱ्याची वैद्यकीय तपासणी पूर्ण होऊन पात्र प्रमाणपत्र सादर केल्याबाबतची नोंद ________ मध्ये केली पाहिजे.

(1) कार्यविवरण नोंदवही (2) सेवा पुस्तक

(3) प्रकरण नोंदवही (4) यापैकी नाही

---

**60.** शासकीय कर्मचाऱ्याने त्याची स्थायी पदावर कायमपणे नियुक्ती होण्यापुर्वी किंवा नियुक्तीच्या तारखेपासून ________ सेवा पूर्ण होण्यापुर्वी, आरोग्याबद्दलचे वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केले पाहिजे.

(1) 1 वर्ष (2) 6 महिने (3) 1 महिने (4) 3 वर्ष

---

**61.** ज्या विशेष परिस्थितीत कर्तव्य पार पाडावयाचे अशा परिस्थितीत करावा लागणारा वैयक्तिक खर्च भागवण्यासाठी देण्यात येणारा भत्ता म्हणजेच ________ होय.

(1) घरभाडे भत्ता (2) स्थानिक भत्ता (3) मानधन (4) पूरक भत्ता

---

**62.** सेवापुस्तकात जन्मतारखेची नोंद करताना ज्याचे जन्मवर्ष माहित आहे पण तारीख माहित नाही, अशा शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत ________ ही जन्मतारीख मानण्यात येते.

(1) 1 जुलै (2) 1 जानेवारी (3) 30 जुलै (4) 1 मे

---

**63.** 'सुटी' च्या व्याख्ये बाबतीत सर्वात योग्य पर्याय निवडा.

(1) सुटी म्हणजे दुसरा व चौथा शनिवार, सर्व रविवार व सर्व सणांचे दिवस

(2) राज्य शासनाने घोषित केलेले सुटिचे सर्व दिवस

(3) जिल्हाधिकाऱ्यांनी आदेशाद्वारे घोषित केलेले सुटीचे दिवस

(4) वरील सर्व

---

**64.** शासकीय कर्मचाऱ्याच्या रजेच्या बाबतीत खालीलपैकी सर्वात योग्य पर्याय निवडा.

(1) रजा शिल्लक असल्यास रजेवर जाण्याचा हक्क असतो

(2) रजा हा हक्क नाही, परंतु पुर्वपरवानगीने रजा घेता येते

(3) पुर्वपरवानगीशिवाय रजा उपयोगल्यास, नंतर रजा हा हक्क म्हणून मंजूर करून मागता येते

(4) वरील सर्व बरोबर

---

**65.** वैद्यकीय अधिकाऱ्याने अपात्र ठरविलेल्या शासकीय कर्मचाऱ्याला

(1) सेवेतून काढून टाकण्यात येईल

(2) अपीलाची संधी देण्यात येईल

(3) अपीलाची संधी प्रकरणपरत्वे देण्यात येईल

(4) राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य) हे स्वेच्छाधिकाराने, विकलांगता या कारणावरून घोषित केलेली अपात्रता माफ करु शकतात

---

**66.** सावधि-नियुक्ती पदासह ज्या स्थायी पदावर शासकीय कर्मचाऱ्याची कायमपणे नियुक्ती केलेली असेल असे स्थायीपद कायमपणे धारण करण्याचा हक्क म्हणजेच ________ होय.

(1) रजा (2) बदली (3) धारणाधिकार (4) स्वीयेत्तर सेवा

---

कच्च्या कामासाठी जागा

www.StudentBounty.com

StudentBounty.com

67. निवृत्तिवेतनामध्ये ________ समावेश होतो.
(1) उपदानाचा (2) रजा रोखीकरणाचा
(3) वैयक्तिक वेतनाचा (4) विशेष वेतनाचा

68. रजेवर असताना शासकीय कर्मचाऱ्याला शासनाने प्रदान केलेली मासिक रक्कम म्हणजे ________ होय.
(1) रजा वेतन (2) मानधन (3) विशेष वेतन (4) वैयक्तिक वेतन

69. ज्या राज्यपत्रित कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते आस्थापनेच्या देयकावर कार्यालय प्रमुखांकडून काढण्यात येतात त्यांच्या व्यतिरिक्त, प्रत्येक राज्यपत्रित शासकीय कर्मचाऱ्याचे सेवाभिलेख ________ सुस्थितीत ठेवील.
(1) कार्यालय प्रमुख (2) लेखापरिक्षा अधिकारी
(3) विधी अधिकारी (4) गोपनीय लिपिक

70. शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकामध्ये खालीलपैकी कोणत्या बाबीची नोंद विभागप्रमुखाचा तसा आदेश असल्याखेरीज घेण्यात येत नाही ?
(1) जन्म तारीख (2) वैद्यकीय पात्रता प्रमाणपत्र
(3) वैयक्तिक चारित्र्य प्रमाणपत्र (4) वरीलपैकी नाही

71. प्रासंगिक स्वरूपाच्या विशेष कामाबद्दल पारिश्रमिक म्हणून भारताच्या किंवा राज्याच्या किंवा संघराज्यक्षेत्राच्या एकत्रित निधीतून मंजूर केलेले आवर्ती किंवा अनावर्ती प्रदान म्हणजेच ________
(1) घरभाडे भत्ता (2) मानधन (3) वैयक्तिक वेतन (4) वेतन

72. शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकामध्ये त्याच्या जन्मतारखेची नोंद करताना, ज्याचे जन्माचे वर्ष व महिना माहित आहे पण नेमकी तारीख माहित नाही त्यावेळी त्या महिन्याची कोणती तारीख त्याची जन्मतारीख मानव्यात यावी ?
(1) 1 (2) 15 (3) 16 (4) 31

73. शासकीय कर्मचाऱ्याने नेहमीच नितांत ________ राखावी व ________ ठेवावी.
(1) प्रामाणिकता, श्रद्धा (2) सचोटी, कर्तव्यपरायणता
(3) प्रतिष्ठा, श्रद्धा (4) वरील पैकी नाही

74. प्रत्येक कार्यालयातील सेवापुस्तके व सेवापट यांची पडताळणी प्रत्येक वर्षाच्या कोणत्या महिन्यात कार्यालय प्रमुखाने केली पाहिजे ?
(1) जानेवारी (2) मार्च (3) मे (4) जुलै

75. दुय्यम कार्यालयात ठेवलेल्या सेवा पुस्तकांची व सेवा पटांची तपासणी करणे हे कोणत्या अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे ?
(1) लेखा परीक्षा अधिकारी (2) संबंधित कार्यालयाचा तपासणी अधिकारी
(3) अधिदान व लेखा अधिकारी (4) प्रशासकीय विभागाचा प्रमुख अधिकारी

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

## विभाग – ब

76. शासनाचे लोकांवर परिणाम करणारे धोरणात्मक निर्णय जनतेला कळवायचे असतात, त्यावेळेस सामान्यत: जाणारा पत्रव्यवहाराचा नमुना
(1) ज्ञापन (2) अधिसूचना (3) पृष्ठांकन (4) प्रसिद्धीपत्रक

77. महत्वाच्या नवीन योजना, नवीन धोरण, अत्यंत महत्वाचे निर्णय इ. महत्वाच्या प्रस्तावांना ______________ च्या संमतीची जरूरी असते.
(1) मंत्रीमंडळ (2) वित्त विभाग (3) सामान्य प्रशासन विभाग (4) विधी व न्याय विभाग

78. "ब" वर्गातील नस्त्यांचे परिरक्षण किती वर्षे करतात ?
(1) 50 वर्षे (2) 20 वर्षे (3) 30 वर्षे (4) अनिश्चित काळापर्यंत

79. धनादेश, बिले, करारनामे, सेवा पुस्तके किंवा इतर कोणतेही मौल्यवान दस्तऐवज नेहमी ______________ पाठवावेत.
(1) पोच देय नोंदणी डाकेने (2) शीघ्र डाकेद्वारे (3) टपाल दाखला घेऊन (4) संदेश वाहकाहाती

80. एखाद्या प्रकरणावरील पुढील कार्यवाही त्यामधील काही माहिती प्राप्त झाल्यानंतर करावयाची असेल अशावेळी ते प्रकरण ______________ म्हणून चिन्हित करण्यात येईल.
(1) सुप्त (2) विचाराधीन (3) दप्तरी दाखल (4) प्रतीक्षाधीन

81. एखादी महत्वाची बाब वा निर्णय अधिकाऱ्यांच्या व्यक्तिगत निदर्शनास आणून त्यांचे लक्ष वेधण्यासाठी ______________ या पत्रव्यवहाराचा वापर करतात.
(1) साधे पत्र (2) पृष्ठांकन (3) अर्धशासकीय पत्र (4) स्मरणपत्र

82. अभिलेखांचे वर्गीकरण करताना 30 वर्षे परिरक्षण करावयाच्या अभिलेखाची वर्गवारी ______________ ही राहील.
(1) 'अ' वर्ग (2) 'ब' वर्ग (3) 'क' वर्ग (4) 'ड' वर्ग

83. टिप्पणी सहायक त्याचे दैनंदिन काम प्रमाणानुसार काढत आहेत किंवा कसे हे तपासण्यासाठी कार्यासन अधिकाऱ्याने ______________ करावे.
(1) कार्यविवरण निरीक्षण (2) दप्तर निरीक्षण (3) कार्यासन निरीक्षण (4) यापैकी नाही

84. भारत सरकार, इतर राज्य शासन किंवा राज्यातील इतर सरकारी अधिकारी यांच्याकडून आलेल्या पत्रांच्या प्रती सरकारी अधिकाऱ्यांना पाठविताना ______________ हा पत्रव्यवहाराचा नमुना वापरतात.
(1) अर्धशासकीय पत्र (2) कार्यालयीन आदेश (3) परिपत्रक (4) पृष्ठांकन

85. ______________ प्रकरणी संबंधित विभागाच्या जबाबदार अधिकाऱ्यांशी वैयक्तिक चर्चा करून तसेच इतर विभागांशी विचार विनिमय घडवून आणून त्यांचे निष्कर्ष त्यांनी आद्याक्षरी केलेल्या टिप्पणीद्वारे अभिलिखित करण्यात यावेत.
(1) आंतर विभागीय संदर्भ (2) विभागीय चौकशी (3) मंत्रीमंडळ टिप्पणी (4) यापैकी काही नाही

86. मंत्रालयीन विभागाची शासकीय कार्यालयाची नोंदणी शाखा शक्यतोवर ______________ असावी.
(1) प्रवेशद्वारापाशी (2) इतर कार्यासनांमध्येच (3) मध्यवर्ती ठिकाणी (4) एका टोकाला

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

87. "अ" आणि "ब" वर्गामध्ये वर्गीकरण केलेल्या फाईलींचे दर किती वर्षांनी पुनर्विलोकन करण्यात यावे ?
(1) 5 (2) 10 (3) 15 (4) 20

88. एखाद्या प्रकरणावरील टिप्पणी सादर करताना, ____________
(1) मतप्रदर्शन करण्यात यावे
(2) सूचना करण्यात याव्यात, परंतु मतप्रदर्शन करण्याचे टाळावे
(3) सूचना व मतप्रदर्शन करण्यास हरकत नाही
(4) सूचना व मतप्रदर्शन दोन्ही करू नये

89. निर्देशपत्रावर फायलीचा ____________ दिलेले असते.
(1) क्रमांक व विषय (2) फक्त क्रमांक (3) फक्त शीर्षक (4) विषय

90. एखाद्या नस्तीमधील (फायलीमधील) सर्व विचाराधीन प्रश्नांवरील कार्यवाही पूर्ण झाल्यावर ती नस्ती बंद करण्याची कार्यपद्धती म्हणजे ____________
(1) वर्गीकरण (2) नोंदणीकरण (3) अभिलेखन (4) पुनर्विलोकन

91. महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या ____________ महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांना विषय नेमून देण्यात आलेले आहेत.
(1) पहिल्या अनुसूची अन्वये (2) दुसऱ्या अनुसूची अन्वये
(3) तिसऱ्या अनुसूची अन्वये (4) चौथ्या अनुसूची अन्वये

92. राज्य शासनाने किंवा राज्य शासनातर्फे दिलेले सर्व आदेश हे ____________ यांच्या नावाने किंवा त्यांच्या आदेशावरून दिल्याचे समजण्यात येईल.
(1) संबंधित मंत्री (2) संबंधित राज्यमंत्री
(3) राज्यपाल (4) सचिव

93. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 166 द्वारा तयार केलेल्या महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या नियम ____________ अन्वये शासनाच्या कामकाजा संबंधी अनुदेश देण्यात आले आहेत.
(1) 9 (2) 12 (3) 15 (4) 3

94. मंत्रिमंडळाचे सचिव म्हणून ____________ हे काम पाहतात.
(1) मुख्यमंत्री (2) उपमुख्यमंत्री (3) मुख्य सचिव (4) विभागाचे सचिव

95. मंत्रिमंडळासमोर सादर केलेल्या टिप्पणीत आर्थिक भार असेल तर __________ यांचे अभिप्राय अत्यावश्यक असतात.
(1) प्रभारीमंत्री (2) राज्यमंत्री (3) सचिव (4) वित्तमंत्री

96. महाराष्ट्र शासन कार्य नियमावलीतील नियमांचे काळजीपूर्वक विभागाचे पालन करण्यास विभागाचे ____ जबाबदार राहतील.
(1) कक्ष अधिकारी (2) अवर सचिव (3) प्रभारीमंत्री (4) विभाग सचिव

97. राज्य शासनाच्या मालकीच्या, त्यात निहित असलेल्या किंवा त्यांच्या व्यवस्थापनाखाली असलेल्या सर्व निधींची सुरक्षा यासाठी ____________ जबाबदार असेल.
(1) नियोजन विभाग (2) समाज कल्याण विभाग
(3) वित्त विभाग (4) विधी व न्याय विभाग

कच्च्या कामासाठी जागा



www.StudentBounty.com

StudentBounty.com

98. राज्यपालांनी स्वाक्षरित केलेली अध्यादेशाची प्रत मिळाल्यानंतर, विभाग ती प्रत प्रसिद्धीसाठी ______ सादर करील.

(1) माहिती व जनसंपर्क विभाग (2) सामान्य प्रशासन विभाग

(3) वित्त विभाग (4) विधी व न्याय विभाग

---

99. केंद्र शासन वा इतर राज्यांशी संबंधित राज्य शासनाच्या संबंधात बाधा आणणारी प्रकरणे आदेश काढण्यापूर्वी ______ यांना सादर करणे आवश्यक आहे.

(1) मुख्यमंत्री व राज्यपाल (2) गृह मंत्री

(3) प्रभारी मंत्री (4) उपमुख्यमंत्री

---

100. अत्यंत गुप्त किंवा गुप्त कागदपत्रे कोणाच्या आदेशांशिवाय दुसऱ्या विभागाला पाठवू नयेत ?

(1) कार्यासन अधिकारी (2) अवर सचिव

(3) उपसचिव किंवा त्यांच्यापेक्षा वरच्या दर्जाचे अधिकारी (4) यापैकी नाही

---

101. महाराष्ट्र शासनाच्या सरळ सेवा भरतीमध्ये मागासवर्गीयांसाठी ______ टक्के आरक्षण आहे.

(1) 15% (2) 33% (3) 30% (4) 52%

---

102. सर्व प्रशासकीय विभागांच्या खर्चावर योग्य नियंत्रण व आर्थिक शिस्त आणण्यासाठी वित्त विभागाने राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राच्या सहाय्याने विकसित केलेली संगणकीय वितरण प्रणाली म्हणजेच

(1) कोषावाहिनी

(2) सेवार्थ प्रणाली

(3) संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणाली (सिम्स)

(4) योजना माहिती व्यवस्थापन प्रणाली (एम पी सिम्स)

---

103. विविध योजनांसाठी निधी संनियंत्रणाच्या कार्यप्रणालीचे सुसूत्रीकरण होऊन कार्यवाही जलद होण्यासाठी नियोजन विभागाने विकसित केलेली आज्ञावली

(1) कोषावाहिनी

(2) महाराष्ट्र योजना माहिती व्यवस्थापन प्रणाली (एम पी सिम्स)

(3) सेवार्थ

(4) राज्य सांख्यिकीय व्यूहरचना आराखडा

---

104. राज्याच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडून दरवर्षी प्रकाशित केले जाणारे महत्त्वाचे प्रकाशन म्हणजे ______

(1) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (2) कार्यक्रम अंदाजपत्रक

(3) संक्षिप्त अर्थसंकल्प (4) अर्थसंकल्पिय प्रकाशन

---

105. सेवार्थ ही वित्त विभागाने तयार केलेली संगणकीय प्रणाली असून त्यात कोणत्या बाबींचा समावेश होतो ?

(1) वैयक्तिक माहिती (2) वेतनपत्र

(3) नवीन अंशदायी निवृत्तीवेतन योजना (4) वरीलपैकी सर्व

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

**106.** नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना ही __________ पासून नियुक्त झालेल्या राज्य शासकीय क... लागू आहे.

(1) 1 नोव्हेंबर 2005 (2) 1 नोव्हेंबर 2006
(3) 1 ऑक्टोबर 2005 (4) 1 ऑक्टोबर 2006

---

**107.** कोकण विभागातील विकास कामांची गती वाढविण्यासाठी त्या विभागात पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी तसेच पर्यटनाला चालना देण्यासाठी शासनाने कोणती योजना लागू केली आहे ?

(1) कोकण विकास कार्यक्रम - 2008 (2) कोकण विकास कार्यक्रम - 2010
(3) कोकण विकास कार्यक्रम - 2009 (4) कोकण विकास कार्यक्रम - 2007

---

**108.** विदर्भातील शेतकरी, मुलींच्या विवाहासाठी कर्जबाजारी होऊ नयेत याकरिता राज्य शासनाकडून राबविण्यात येणारी योजना __________

(1) जिजामाता महिला आधार योजना (2) शुभमंगल सामूहिक विवाह योजना
(3) कामधेनू योजना (4) महिला समुपदेशन केंद्र योजना

---

**109.** महाराष्ट्र राज्यामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमाती आश्रमशाळांमधील मुलामुलींना देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांमध्ये वाढ करण्याबाबत कोणता आहार पुरविण्याचा निर्णय दि 31/03/2011 रोजी शासनाने घेतला ?

(1) सक्षम अन्न द्रव्य पूरक आहार (2) सकस अन्नद्रव्य पूरक आहार
(3) दुग्धजन्य अन्नद्रव्य पूरक आहार (4) सुक्ष्म अन्नद्रव्य पूरक आहार

---

**110.** राज्यातील पर्जन्यधारित कोरडवाहू शेतीसाठी पाणलोट व जलसंवर्धन माध्यमातून जलसिंचन उपलब्धता वाढविणे, अत्यंत मौल्यवान असे पाणी व माती यांचे संवर्धन करणे याकरिता राज्यात कोणते अभियान सुरु करण्यात आले आहे ?

(1) महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियान
(2) छत्रपती शिवाजी महाराज जल व भूमी संधारण अभियान
(3) राजर्षी शाहू महाराज जल व भूमी संधारण अभियान
(4) यशवंतराव चव्हाण जल व भूमी संधारण अभियान

---

**111.** महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) व म.ना.से. (शिस्त व अपील) नियम 1979 अंतर्गत येणाऱ्या सर्व बाबी __________ हा या विभागाचा विषय आहे.

(1) वित्त विभाग (2) राजशिष्टाचार विभाग
(3) गृह विभाग (4) सामान्य प्रशासन विभाग

---

**112.** महाराष्ट्रात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी मागणी आधारीत कोणता प्रकल्प राबविण्यात आला ?

(1) पाणी पुरवठा प्रकल्प (2) जल स्वराज्य प्रकल्प
(3) आपले पाणी प्रकल्प (4) राष्ट्रीय ग्रामिण पेय जल प्रकल्प

---

**113.** प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामात पारदर्शकता आणणे व त्यात उत्तरदायित्त्व निर्माण करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाखालील माहिती नागरिकांना मिळवता यावी यासाठी __________ ची स्थापना राज्यात करण्यात आली आहे.

(1) राज्य निवडणूक आयोग (2) राज्य महिला आयोग
(3) राज्य माहिती आयोग (4) चौकशी आयोग

---

**कच्च्या कामासाठी जागा**



StudentBounty.com
www.StudentBounty.com

StudentBounty.com

114. शासकीय कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीविषयक नोंदीची माहिती ____________ आज्ञावलीद्वारा मिळू शक
(1) शोध (2) समय (3) संपर्क (4) सहज

115. राज्यातील बालकुपोषण, बालमृत्यु या गंभीर समस्यांना आळा घालण्यासाठी व माता-बालकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासीठी कोणत्या मिशनची स्थापना करण्यात आली आहे ?
(1) इंदिरा गांधी माता-बाल आरोग्य पोषण मिशन (2) सावित्रीबाई फुले माता-बाल संगोपन अभियान
(3) राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन (4) माता-बाल आरोग्य व पोषण मिशन

116. विधानसभेच्या अतारांकित प्रश्नांची उत्तरे ते शासनास मिळाल्यापासून किती दिवसात द्यावी लागतात ?
(1) 30 (2) 45 (3) 60 (4) 90

117. पूरक अनुदानांसाठीच्या मागण्यांची छाननी करणे तसेच समितीकडे विचारार्थ पाठविण्यात येतील अशा वित्तीय प्रश्नांवर सरकारला सल्ला देणे हि कामे कोणती समिती पार पाडते ?
(1) लोकलेखा समिती (2) कामकाज सल्लागार समिती
(3) अंदाज समिती (4) आश्वासन समिती

118. अतारांकित प्रश्नाची चर्चा सभागृहात जास्तित जास्त किती वेळ करता येते ?
(1) 10 मिनिटे (2) अर्धा तास (3) एक तास (4) प्रश्नावर चर्चा होत नाही

119. अर्धातास चर्चेकरिता दिलेल्या नोटीशीची मुदत कमी करण्याचे तसेच नोटिस अनावश्यक ठरविण्याचे अधिकार कोणाला आहेत ?
(1) मुख्यमंत्री (2) विरोधी पक्ष नेता
(3) विधानसभा अध्यक्ष (4) संबंधित विभागाच्या प्रभारी मंत्र्याच्या संमतीने विधानसभा अध्यक्ष

120. विधानमंडळ सदस्याने दाखल केलेला एखादा प्रश्न स्वीकार्य होण्यासाठी
अ) तो अतिशय लांबलचक असता कामा नये
ब) त्यात वैयक्तिक चारित्र्यावर आरोप केलेले असू नयेत
क) प्रश्न विचारणारा सदस्य सत्ताधारीपक्षाचा असू नये
ड) त्यात सभागृहाने नेमलेल्या कोणत्याही समीतीच्या कामकाजाविषयी माहिती विचारलेली असता कामा नये
(1) सर्व पर्याय बरोबर आहेत (2) फक्त अ, ब व ड पर्याय बरोबर आहेत
(3) फक्त अ व ब पर्याय बरोबर आहेत (4) सर्व पर्याय चूक आहेत

121. निकडीच्या स्वरूपाच्या प्रश्नाचे उत्तर ताबडतोब मिळविण्यासाठी असा प्रश्न विधानसभा नियम ________ अन्वये अल्पावधी सुचना प्रश्न म्हणून विचारला जातो.
(1) 84 (2) 85 (3) 86 (4) 87

122. राज्याच्या विनियोजन लेख्यासंबंधातील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अहवालाचे परिनिरीक्षण करण्याचे काम विधानमंडळाची कोणती समिती करते ?
(1) अंदाज समिती (2) पंचायतराज समिती (3) लोकलेखा समिती (4) नियम समिती

कच्च्या कामासाठी जागा

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**123.** संयुक्त समितीचे हे पदसिद्ध सदस्य असतात

(1) मुख्यमंत्री (2) उपमुख्यमंत्री

(3) संबंधित विभागाचे प्रभारी मंत्री (4) विरोधी पक्ष नेता

**124.** विधानसभेच्या एका अधिवेशनात नियम क्र. 106(2) अन्वये एक सदस्य जास्तित जास्त किती अशासकिय ठरावांची नोटीस देऊ शकतो ?

(1) 3 (2) 5 (3) 7 (4) मर्यादा विहित केलेली नाही

**125.** लोकलेखा समितीचे सदस्य कधी पर्यंत आपले पद धारण करतील ?

(1) समिती बर्खास्त होईपर्यंत (2) विधानसभा विसर्जीत होईपर्यंत

(3) नवीन समितीची रचना करण्यात येईपर्यंत (4) यापैकी नाही

**126.** विधानमंडळाच्या सदस्याला विधानमंडळाच्या अधिवेशनात यातील कोणत्या बाबीसंदर्भात प्रश्न विचारता येईल ?

(1) राज्याच्या एखाद्या मंत्र्याच्या अखत्यारीतील विभागामध्ये विकास योजना अंमलबजावणीत झालेला भ्रष्टाचार

(2) न्यायालयात निर्णयासाठी प्रलंबित असलेली बाब

(3) न्यायालयाने सरकारविरोधात दिलेला चूकीचा निर्णय

(4) न्यायदानविषयक कामे करीत असताना न्यायाधिशाने केलेले वर्तन

**127.** अंदाज समितीमध्ये जास्तीत जास्त किती सदस्यांचा समावेश असतो ?

(1) 28 (2) 29 (3) 30 (4) 31

**128.** मंत्र्यानी वेळोवेळी विधानसभेत दिलेली आश्वासने, वचने व हमी यांची छाननी करण्यासाठी तसेच त्यांची वेळेत अमलबजावणी करण्यात आली किंवा कसे हे पाहण्यासाठी कोणत्या समितीची स्थापना करण्यात येते ?

(1) अंदाज समिती (2) सार्वजनिक उपक्रम समिती

(3) लोकलेखा समिती (4) शासकिय आश्वासन समिती

**129.** अर्थसंकल्पीय धोरणात काटकसरीचे उपाय सुचविणे, अर्थसंकल्पीय अंदाज व पूरक अनूदानावरील मागण्यांची छाननी करणे हे काम कोणाचे आहे ?

(1) लोकलेखा समिती (2) सार्वजनिक उपक्रम समिती

(3) अंदाज समिती (4) पंचायत राज समिती

**130.** शासकीय आश्वासन समिती पुढे साक्ष देण्यासाठी समितीच्या चर्चेत तिला सहाय्यकरण्यासाठी पुढील अधिकारी हजर राहणे आवश्यक असते

(1) कक्ष अधिकारी (2) उप सचिव (3) अवर सचिव (4) संबंधित सचिव

**131.** तारांकित प्रश्नाला उत्तर देण्यात येते.

(1) तोंडी (2) मंत्र्यांच्या सहीने

(3) सचिवांच्या सहीने (4) यापैकी काही नाही

कच्च्या कामासाठी जागा



www.StudentBounty.com

StudentBounty.com

**132.** सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर अर्धा तास चर्चा करण्यासाठी

(अ) अध्यक्ष गुरुवार, मंगळवार किंवा इतर कोणताही दिवस नेमून देतात

(ब) सदर चर्चेची वेळ हि त्या दिवसाच्या बैठकिच्या शेवटी असते

(क) तीन दिवस अगोदर सचिवांना नोटीस द्यावी लागते

(ड) सदर बाब त्यादिवशी निकालात काढण्यात आली नसेल तर संबंधित सदस्याच्या इच्छेनुसार पुढील दिवशी मांडता येईल

(1) सर्व विधाने चूकीची आहेत (2) विधाने अ व ब बरोबर आहेत

(3) विधाने अ व ड बरोबर आहेत (4) सर्व विधाने बरोबर आहेत

---

**133.** विधान परिषदेत प्रश्न विचारताना

(1) गुप्त स्वरूपांच्या बाबी संबंधी विचारण्याचा हेतू असता कामा नये

(2) गुप्त स्वरूपाची महिती विचारला येते

(3) सुरक्षेला बाधा येईल अशी माहिती विचारता कामा नये

(4) या पैकी काही नाही

---

**134.** विधानपरिषदेत अर्धा तास चर्चेद्वारे उपस्थित होणाऱ्या महत्वाच्या बाबी नियम क्र. __________अन्वये उपस्थित करता येतात.

(1) विधान परिषद नियम 91 (2) विधान परिषद नियम 92

(3) विधान परिषद नियम 93 (4) विधान परिषद नियम 94

---

**135.** शासकिय ठरावांच्या बाबतित __________दिवसांची नोटीस देणे आवश्यक आहे.

(1) 45 (2) 30 (3) 15 (4) 7

---

**136.** अशासकिय ठराव स्वीकार्ह होण्यासाठी

(अ) त्यात राष्ट्रपतीच्या आचरणावर ठपका ठेवलेला असणार नाही

(ब) त्यात राज्यपालांच्या आचरणावर ठपका ठेवलेला असणार नाही

(क) त्यात न्यायधिशांच्या आचरणावर ठपका ठेवलेला असणार नाही

(ड) त्यात मानहानीकारक मजकूर असणार नाही

(1) सर्व पर्याय बरोबर आहेत (2) सर्व पर्याय चूकीचे आहेत

(3) फक्त अ, ब व क बरोबर आहेत (4) फक्त ड बरोबर आहे

---

**137.** एखादा प्रश्न विधान परिषदेत स्वीकार्य व्हावा यासाठीच्या शर्ती कोणत्या नियमाद्वारे स्पष्ट केलेल्या आहेत ?

(1) वि.प.नियम 68 (2) वि.प.नियम 69 (3) वि.प.नियम 72 (4) वि.प.नियम 74

---

**138.** विधानपरिषदेच्या एका अधिवेशनात प्रत्येक सदस्यास किती अशासकिय ठराव दाखल करता येतील ?

(1) अमर्याद (2) सभापतींच्या मान्यतेने जास्तीत जास्त तीस

(3) सभापतींच्या मान्यतेने दहा (4) सभापतींच्या मान्यतेने जास्तीत जास्त पाच

---

**139.** विधानपरिषदेत मांडण्यात येणाऱ्या ठरावावर भाषण करण्यासाठी किती कालमर्यादा आहे ?

(1) 15 मिनीटे (2) 45 मिनीटे

(3) 1 तास (4) 30 मिनीटे किंवा सभापती परवानगी देतील इतका कालावधी

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**140.** निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर विधानसभा नियम 101 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेत भाग घेण्याची संधी प्रथम कोणाला दिली जाते ?

(1) विरोधीपक्ष नेता (2) चर्चा उपस्थित करण्यास पाठिंबा देणाऱ्या सदस्यास
(3) विरोधी पक्षाचा कोणत्याही सदस्यास (4) चर्चेची पूर्वसूचना देणाऱ्या सदस्यास

---

**141.** कोणतीही व्यक्ती ती भारतीय नागरिक आणि __________ वर्षे पूर्ण वयाची असल्या खेरीज राज्यपाल पदावरील नियुक्तीस पात्र असणार नाही.

(1) 25 (2) 30 (3) 35 (4) यापैकी नाही

---

**142.** मंत्रिपरिषदेतील मुख्यमंत्र्यासह राज्यातील मंत्र्याची एकूण संख्या कमीत कमी किती असणे आवशक आहे ?

(1) बारा (2) चौदा (3) बावीस (4) चोवीस

---

**143.** राज्यपाल __________ संबोधून आपल्या अधिकारपदांचा सहीनिशी लेखी राजीनामा देऊ शकेल.

(1) राष्ट्रपतीला (2) मुख्यमंत्र्याला (3) पंतप्रधानाला (4) यापैकी कोणताही नाही

---

**144.** राज्यपालांचे वैधानिक अधिकार संविधानातील अनुच्छेद __________ मध्ये नमूद करण्यात आले आहेत.

(1) 210 (2) 211 (3) 212 (4) 213

---

**145.** राज्यपालांची नियुक्ती __________ यांचे मार्फत करण्यात येते.

(1) मुख्यमंत्री संबंधीत राज्य (2) पंतप्रधान
(3) राष्ट्रपती (4) राज्याचे मंत्रिमंडळ

---

**146.** मंत्रिपरिषद कोणास सामुदायिकपणे जबाबदार आहे ?

(1) राज्यपाल (2) मुख्यमंत्री (3) उपमुख्यमंत्री (4) विधानसभा

---

**147.** राज्य विधानमंडळाच्या सभागृहाचा एखादा सदस्य संसदेने पारित केलेल्या कायदद्याद्वारे अपात्र झाल असेल तर अपात्रते बाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार कोणास आहेत ?

(1) मुख्यमंत्री (2) विधानसभा अध्यक्ष
(3) राज्यपाल (4) उपमुख्यमंत्री

---

**148.** धन विधेयकाबाबतची विशेष कार्यपद्धती संविधानाच्या __________ अनुच्छेदात नमूद करण्यात आली आहे.

(1) 196 (2) 197 (3) 198 (4) 199

---

**149.** दोन अधिवेशन सत्रामध्ये किती कालवधीपेक्षा जास्त अंतर असणार नाही अशी तरतूद आहे ?

(1) सहा महिने (2) दोन महिने (3) चार महिने (4) आठ महिने

---

**150.** राज्य विधानमंडळाची सत्रे, सत्र समाप्ती व विसर्जन या बाबतची तरतूद संविधानाच्या __________ अनुच्छेदात करण्यात आली आहे.

(1) 173 (2) 174 (3) 175 (4) 176

---

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

## विभाग – क

76. दोन किंवा अधिक राज्यांच्या समूहाकरीता एकच लोकसेवा आयोग नियुक्त केला असेल तर त्याला खालील कोणत्या नावाने संबोधण्यात येते ?
(1) मिश्र आयोग (2) राज्य लोकसेवा आयोग
(3) संयुक्त राज्य लोकसेवा आयोग (4) संघ लोकसेवा आयोग

77. राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांची व सदस्यांची नियुक्ती खालीलपैकी कोण करतात ?
(1) राज्याचे मुख्यमंत्री (2) पंतप्रधान
(3) राज्याचे राज्यपाल (4) राष्ट्रपती

78. राज्य लोकसेवा आयोगाच्या सदस्याची नियुक्ती ही ________ वर्षे किंवा वयाची ________ वर्षे पूर्ण करीपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल इतक्या कालावधी साठी असते.
(1) 6 वर्षे किंवा वयाची 62 वर्षे (2) 5 वर्षे किंवा वयाची 62 वर्षे
(3) 6 वर्षे किंवा वयाची 65 वर्षे (4) 5 वर्षे किंवा वयाची 65 वर्षे

79. दरवर्षी राज्य लोकसेवा आयोगाने केलेल्या कामाचा अहवाल राज्याच्या विधीमंडळा समोर ठेवण्याची व्यवस्था कोण करतो ?
(1) राज्याचे मुख्यमंत्री (2) राज्याचे राज्यपाल
(3) विरोधी पक्ष नेते (4) सभापती

80. दरवर्षी अहवाल सादर करताना ज्या प्रकरणी आयोगाचा सल्ला स्वीकारला नव्हता अशी प्रकरणे असल्यास, अशा प्रकरणी अस्वीकृतीची कारणे स्पष्ट करणाऱ्या निवेदनाची एक प्रत विधान मंडळासमोर सादर करण्याची तरतूद संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदाद्वारे करण्यात आली आहे ?
(1) अनुच्छेद 315 (2) अनुच्छेद 317 (3) अनुच्छेद 319 (4) अनुच्छेद 323

81. राज्य लोकसेवा आयोगाची निर्मिती घटनेच्या कोणत्या कलमानुसार करण्यात आलेली आहे ?
(1) 320 (2) 230 (3) 315 (4) 313

82. राज्य लोकसेवा आयोगाच्या एकूण सदस्यांपैकी किती टक्के सदस्य हे राज्यशासनाची निदान 10 वर्षे सेवा केलेली असावेत ?
(1) 50% (2) 25% (3) 70% (4) 35%

83. लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष किंवा अन्य सदस्य यांना कोण आदेशाद्वारे पदावरून दूर करू शकतो ?
(1) राज्याचा राज्यपाल (2) राज्याचा मुख्यमंत्री
(3) पंतप्रधान (4) राष्ट्रपती

84. राज्य लोकसेवा आयोगाच्या सदस्यांस निलंबीत करण्याचा अधिकार कोणास आहे ?
(1) संबधित आयोगाच्या अध्यक्षांस (2) संबधित राज्याच्या मुख्यमंत्र्यास
(3) संबधित राज्याच्या राज्यपालांस (4) संबधित राज्याच्या विधानसभेस

85. संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदान्वये राज्यपालांना आयोगाच्या कर्मचारी वर्गाच्या सदस्यांची संख्या आणि त्यांच्या सेवाशर्ती या बाबत तरतूद करता येईल ?
(1) 317 (2) 316 (3) 318 (क) (4) 318 (ख)

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**86.** सेवानिवृत्त झाल्यावर राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष हा खालील पदांवर नियुक्त होण्यास पात्र असेल
(1) संघ लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष (2) संघ लोकसेवा आयोगाचा सदस्य
(3) अन्य राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष (4) वरील सर्व

**87.** संविधानाच्या अनुच्छेद 320 नुसार काय निश्चीत करण्यात आले आहेत ?
(1) लोकसेवा आयोगाची स्थापना (2) आयोगाच्या सदस्यांची नियुक्ती आणि पदावधी
(3) लोकसेवा आयोगाची कार्ये (4) आयोगाच्या सदस्यांच्या सेवा शर्ती

**88.** राज्य लोकसेवा आयोगाचे कार्याधिकार विस्तारण्याचे अधिकार कोणास आहेत ?
(1) लोकसभा (2) राष्ट्रपती (3) राज्यपाल (4) राज्य विधान मंडल

**89.** संघ किंवा राज्य लोकसेवा आयोगाचा खर्च हा भारताच्या किवां राज्यांच्या एकत्रीत निधीतून भागविण्याची तरतूद कोणत्या अनुच्छेदानुसार आहे ?
(1) 318 (2) 319 (3) 322 (4) 323

**90.** राज्य लोकसेवा आयोगास आपल्या कामाचा वार्षिक अहवाल खालीलपैकी कोणत्या अनुच्छेदानुसार सादर करणे हे आयोगाचे कर्तव्य असते ?
(1) अनु. 321 नुसार (2) अनु. 323 नुसार
(3) अनु. 322 नुसार (4) अनु. 319 नुसार

**91.** सरळसेवा प्रवेशद्वारे (थेट मुलाखातीद्वारे) उमेदवाराची निवड करतांना आयोगाकडून घेतल्या जाणाऱ्या मुलाखतींच्या वेळी मुलाखतीचे गुण दर्शवितांना very good हा शेरा कोणत्या टप्प्यासाठी दर्शविला जातो ?
(1) 40 आणि त्यापेक्षा कमी (2) 70 आणि त्यापेक्षा जास्त
(3) 50 ते 59 (4) 60 ते 69

**92.** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या मुलाखतीचे वेळी आयोगाला सहाय्य करण्यास शासनाचा प्रतिनिधी हा खाली नमूद अधिकाऱ्यांपेक्षा कनिष्ठ दर्जाचा असू नये
(1) सचिव (2) संचालक
(3) सहसचिव किंवा सहसंचालक (4) मुख्य सचिव

**93.** सरळ सेवा प्रकरणी राज्य पातळीवरील खाते प्रमुखाचे एकाकी पद असेल आणि त्याची वेतनश्रेणी सहसचिव व त्यावरील दर्जाची असेल तर अशा प्रकरणी एका पदासाठी जास्तीत जास्त किती उमेदवारांना मुलाखतीस बोलविता येईल ?
(1) पाच (2) दहा (3) सात (4) नऊ

**94.** प्रश्नपत्रिकेतील प्रश्न मुद्रण दोषामुळे रद्द करावा लागला तर संबंधीत मुद्रणालयास प्रत्येक चुकीसाठी किती दंड आकारला जातो ?
(1) रु. 500/- (2) रु. 1,000/- (3) रु. 10,000/- (4) रु. 25/-

**95.** सध्या अस्तित्वात असलेल्या दि 2/6/03 च्या स्थायी आदेशानुसार मुलाखत पणे उमेदवारांना मुलाखतीच्या दिनांका पूर्वी किती दिवस आधी रवाना करण्यात यावीत ?
(1) 10 (2) 15 (3) 18 (4) 21

**96.** दि 28/6/11 च्या स्थायी आदेशान्वये आयोगाच्या कार्यालया मार्फत विविध कारणांसाठी करण्यात येणाऱ्या खर्चाच्या मान्यतेसाठी स्थापन केलेल्या विभागीय खरेदी समिती मध्ये खालील कोणाचा समावेश नाही ?
(1) सचिव (2) सहसचिव/ज्येष्ठ उपसचिव
(3) आयोगाचे सदस्य (4) लेखाधिकारी

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com



**97.** स्पर्धा परीक्षा तसेच चाळणी परीक्षांच्या निकाल प्रक्रिये संदर्भात संगणक संस्थेकडून प्राप्त झालेल्या अहवा[illegible] कक्षाच्या कक्ष अधिकाऱ्याने किती टक्के तपासणी करणे आवश्यक आहे ?

(1) 50% (2) 100% (3) 60% (4) 5%

---

**98.** मा.अध्यक्षाच्या अध्यक्षते खाली आवश्यकतेनुसार आयोगाची बैठक कधी घेण्यात येते ?

(1) प्रत्येक महिन्यात पहिला व तिसऱ्या सोमवारी
(2) प्रत्येक महिन्यात दुसऱ्या व तिसऱ्या मंगळवारी
(3) प्रत्येक महिन्यात पहिला गुरुवारी
(4) प्रत्येक महिन्यात शेवटच्या शनिवारी

---

**99.** ऑन लाईन पद्धतीने आलेल्या अर्जांची स्वीकृती करण्यासाठी कोणत्या संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे ?

(1) Vast India Pvt. Ltd. (2) Exxon Computers Pvt. Ltd.
(3) Post Office (4) Bank of India

---

**100.** ऑन लाईन पद्धतीमध्ये एखाद्या पदासाठी/परीक्षेकरीता अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवारांस प्रथम आयोगाच्या कोणत्या वेबसाईट वर नोंदणी करावी लागते ?

(1) www. MPSC. gov. in. (2) www. mpsconline.gov. in.
(3) www. upsc. gov.in (4) www. nic. gov. in.

---

**101.** संघ लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर राज्य लोकसेवा आयोगास खाजगी मुद्रणालयाकडून पेपर छपाई करून घेण्यास शासनाने कोणत्या दिनांकाच्या शासन निर्णया द्वारे मान्यता दिली आहे ?

(1) 16 डिसेंबर 2000 (2) 17 ऑक्टोबर 1998
(3) 1 मार्च 1997 (4) 29 ऑक्टोबर 2010

---

**102.** राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती इ.मा.व.व विशेष मागास प्रवर्ग या मधील नॉन क्रिमिलेअरसाठी असलेली उत्पन्न मर्यादा ही चार लाखावरून रूपये 4.50 लाख (साडेचार लाख) कधी पासून करण्यात आली आहे ?

(1) 20 ऑक्टोबर 2006 (2) 16 जून 1997
(3) 13 जानेवारी 2009 (4) 21 जानेवारी 2010

---

**103.** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांना प्रदान करण्यात आलेला वित्तीय आणि प्रशासकीय अधिकार वापरतांना "वित्तीय सल्लागार म्हणून नियुक्त अधिकाऱ्याचा सल्ला घेण्याची" अट केव्हा पासून वगळण्यात आली ?

(1) 10 ऑक्टोबर 1983 (2) 3 ऑगस्ट 1993
(3) 28 जानेवारी 1995 (4) 20 जुलै 1997

---

**104.** सेवा-भरती करण्या कारीता सेवा प्रवेश नियमानुसार विहीत अनुभवांची गणना करतांना खालील पैकी कोणता अनुभव पूर्णवेळ काम केले असल्यासच ग्राह्य धरण्यात येईल ?

(1) अंश कालीन (2) विद्या वेतनी (3) कार्यव्ययी (4) अतिरीक्त कार्यभार

---

**105.** शासकीय व निमशासकीय कार्यालयात वर्ग : 1 च्या पदासाठी खेळांडूचे आरक्षण मिळण्यास कोणत्या स्तरावरील प्रमाण पत्र आवश्यक आहे ?

(1) राष्ट्रीय स्तर (2) विद्यापीठ स्तर (3) आंतरराष्ट्रीय स्तर (4) राज्य स्तर

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

106. आयोगाशी पत्र व्यवहार करतांना तो “सचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग” यांच्या नावे करावा अशा सूचना मंत्रालयीन विभागांना कोणत्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत ?

(1) 20 ऑक्टोबर 1996 (2) 15 जून 1995
(3) 18 ऑक्टोबर 1995 (4) 18 मार्च 1997

---

107. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कोणत्या कलमान्वयें प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे कडे प्राप्त होणारी सर्व अपिले विहीत मुदतीत निकालात काढणे आवश्यक आहे ?

(1) कलम 15 (2) कलम 19 (1) (3) कलम 21 (4) कलम 18

---

108. “अ” व “ब” वर्गीकरण केलेल्या नस्त्यांचे किती वर्षांनी पुनर्विलोकन होणे आवश्यक आहे ?

(1) 15 वर्षे (2) 20 वर्षे (3) 10 वर्षे (4) 5 वर्षे

---

109. विहीत मुदतीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या कर्मचाऱ्यांना कालबद्ध / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ कधी पासून देण्यात आला आहे ?

(1) 15 ऑक्टोबर 2009 (2) 20 जुलै 2001
(3) 17 फेब्रुवारी 2006 (4) 20 मार्च 1997

---

110. शासकीय सेवेतील महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक छळवणुकीच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा कार्यालयात महिला तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली सदर समितीच्या अध्यक्षा कोण आहेत ?

(1) श्रीमती शु.स.परब (2) श्रीमती दी.प्र.मिरजकर
(3) श्रीमती वि.दि.पडते (4) श्रीमती सं.चं.सावंत

---

111. आयोगाच्या कार्यालयीन आदेश क्रं. 6/2007, दि. 6 एप्रिल 2007 अन्वये शासनाच्या कुठल्या किमान दर्जाच्या अधिकाऱ्याने आयोगाशी पत्र व्यवहार करणे आवश्यक आहे ?

(1) प्रधान सचिव (2) मुख्य सचिव (3) सह सचिव (4) उपसचिव

---

112. राज्य सेवा (मुख्य) परीक्षा एकूण किती गुणांची असते ?

(1) 1200 (2) 1600 (3) 1800 (4) 2000

---

113. स्पर्धा परीक्षेच्या खालीलपैकी कुठल्या पदांसाठी, अपंगासाठी आरक्षण व वयाची सूट देण्यात येत नाही ?

(1) महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (2) सहायक
(3) विक्रीकर निरीक्षक (4) पोलीस उप निरीक्षक

---

114. आयोगाच्या कामकाजामध्ये खर्च कमी होण्याच्या दृष्टीने व विलंब टाळण्याच्या दृष्टीने अत्यानुधिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या धोरणानुसार उमेदवारांना मुलाखतीचा दिनांक, वेळ व ठिकाण तसेच परीक्षेची प्रवेश पत्रे निर्गमित केलयाची बाब खालीलपैकी कोणत्या प्रणालीच्या माध्यमातून कळविली जाते ?

(1) दूरमुद्रण (2) ई–मेल (3) वेबसाईट (4) एस् एम एस्

---

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

115. आयोगातर्फे उमेदवारांना खालीलपैकी कोणते गुण कळविले जातात ?
(1) चाळणी परीक्षेतील गुण
(2) सरळ सेवा भरतीसाठी घेण्यात येणाऱ्या मुलाखतीचे गुण
(3) पूर्व स्पर्धा परीक्षेतील गुण
(4) मुख्य स्पर्धा परीक्षेतील गुण

116. शासनाकडून आयोगास केला जाणाऱ्या पत्रव्यवहाराची खास बाब कोणती आहे ?
(1) आयोगाशी केला जाणारापत्रव्यवहार उपसचिवांचे नांवे होतो
(2) आयोगाशी केला जाणारापत्रव्यवहार अध्यक्षांच्या नांवे होतो
(3) मंत्रालयीन विभागाच्या दुय्यम कार्यालया प्रमाणे होतो
(4) आयोगाच्या संविधानिक दर्जानुसार खास अग्रेषण पत्राव्दारे करण्यात येतो

117. आयोगाकडून स्पर्धा परीक्षांचे अर्ज कोणत्या पद्धतीने मागविण्यात येतात ?
(1) टपालाव्दारे
(2) वेब बेस्ड (web-based) ऑनलाईन प्रणालीव्दारे
(3) खाजगी कुरिअरव्दारे
(4) हस्तांतराने

118. आयोगाच्या कार्यालयातील गट-अ च्या अधिकाऱ्यांसाठी अपील प्राधिकारी कोण आहेत ?
(1) आयोगाचे सचिव
(2) राज्यपाल
(3) आयोगाचे अध्यक्ष
(4) आस्थापना उपसचिव

119. आयोगाच्या कार्यालयातील कामकाजाची विभागणी एकूण किती प्रमुख विभागात करण्यात आली आहे ?
(1) 6 विभाग (2) 4 विभाग (3) 5 विभाग (4) 3 विभाग

120. आयोगाच्या कार्यालयातील विभागाकडून/कक्षाकडून आयोगाच्या नावाने होणारा गोपनीय/अगोपनीय पत्रव्यवहार कोणाच्या मान्यतेने किंवा स्वाक्षरीने करणे आवश्यक आहे ?
(1) आयोगाचे सदस्य
(2) आयोगाचे अध्यक्ष
(3) आयोगाचे उपसचिव
(4) आयोगाचे सचिव

121. पोलीस उप निरीक्षक स्पर्धा परीक्षा ही पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा, शारीरिक चाचणी व मुलाखत अशी चार टप्प्यान घेण्यात येते. मुख्य परीक्षेतून शारीरिक चाचणी करिता पदसंख्येच्या तुलनेत साधारण किती पट उमेदवारांची संख्या मर्यादित केली जाते ?
(1) 10 पट (2) 5 पट (3) 4 पट (4) 3 पट

122. आयोगामार्फत घेतलया जाणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा तसेच सरळ सेवा भरतीच्या प्रकरणी अंतिम निकाल तयार करताना समान गुण धारण करणाऱ्या अर्हताप्राप्त उमेदवारांची प्राधान्यक्रमवारी (Ranking) ठरविताना खालीलपैकी कोणता निकष विचारात घेतला जात नाही ?
(1) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास धारण केलेली उच्च शैक्षणिक अर्हता व त्यामध्ये विद्यावाचस्पती (Doctorate) संशोधन पदव्युत्तर पदवी (M.Phil.), पदव्युत्तर पदवी या उतरत्या क्रमाने
(2) उच्च शैक्षणिक अर्हतेत प्राप्त केलेली श्रेणी/वर्ग
(3) वय-वयाने जेष्ठ असलेलयांचा क्रम वरती राहील
(4) उमेदवारांच्या आडनांवाच्या आद्याक्षरानुसार

कच्च्या कामासाठी जागा

www.StudentBounty.com

StudentBounty.com

123. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 320 अन्वये राज्य लोकसेवा आयोगाकडे सोपविण्यात आलेल्या कार्यांमध्ये शासनाला पुढीलपैकी कोणत्या बाबीवर आयोगाकडून सल्ला दिला जात नाही ?
(1) विविध सेवांमध्ये भरती करण्याच्या पद्धतीशी संबंधित बाबी
(2) शासकीय कर्मचाऱ्या संबंधी शिस्त विषयक बाबी
(3) आपली कर्तव्य पार पाडीत असताना शासकीय कर्मचाऱ्यांनी केलेल्या कृत्याबाबत त्याच्या विरुद्ध करण्यात आलेल्या वैध कार्यवाहीत बचावासाठी त्यांना करावा लागलेला खर्च परत मिळण्यासाठी करण्यात आलेल्या मागण्या
(4) शासकीय कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील मृत्यु-नि-सेवानिवृत्ती वेतन/अंशदानात्मक निवृत्तीवेतन देण्याबाबतच्या मागण्या

124. तुरुंग अधिकारी पदाची विभागीय परीक्षा एका वर्षात किती वेळ घेणात येते ?
(1) एकदा (2) दोनदा (3) तीनदा (4) यापैकी नाही

125. आयोगाच्या कार्यालयाची विभागणी एकूण किती कक्षामध्ये करण्यात अलीली आहे ?
(1) 30 कक्ष (2) 25 कक्ष (3) 24 कक्ष (4) 28 कक्ष

126. राज्य लोकसेवा आयोगाचे कार्याधिकार विस्तारित करण्याची शक्ती संविधानानुसार कोणाला देण्यात आली आहे ?
(1) राज्यपाल (2) मुख्य सचिव (3) आयोगाचे अध्यक्ष (4) विधानमंडळ

127. स्थायी आदेश क्रं. 4/2011, दि. 21 जून 2011, अन्वये कागद पत्रांची नस्ती तयार करण्याची सुधारीत कार्यपद्धत कोणती आहे ?
(1) टिप्पणी विभागातील कागद पत्रांचे क्रं. हे डावी कडून उजवीकाडे 1,2,3..., तर पत्र व्यवहार विभागातील कागद पत्रांचे क्रं.हे डावी कडून उजवीकडे 1,2,3....
(2) टिप्पणी विभागातील कागद पत्रांचे क्रं. हे उजवीकडून डावीकडे 100,99...2,1, तर पत्र व्यवहार विभागातील कागद पत्राचे क्रं. हे उजवी कडून डावी कडे 100,99...2,1
(3) टिप्पणी विभागातील कागदपत्रांचे क्रं. हे डावी कडून उजवी कडे 1,2,3...., तर पत्र व्यवहार विभागातील कागद पत्रांचे क्रं. हे उजवी कडून डावी कडे 1,2,3...99,100
(4) टिप्पणी विभागातील कागद पत्रांचे क्रं. हे उजवी कडून डावी कडे 100,99...2,1, तर पत्र व्यवहार विभागातील कागद पत्राचे क्रं. हे डावी कडून उजवीकडे 1,2,3....

128. माजी सैनिक/आणीबाणी राजादिष्ठ अधिकारी व अल्पकालीन सेवा राजादिष्ठ अधिकारी यांना शासकीय सेवेत वर्ग - 1व वर्ग - 2 मधील पदांवर नेमणूक देताना खालीलपैकी कोणती सवलत दिली जाते ?
(1) शुल्क (2) वयोमर्यादा (3) शैक्षणिक अर्हता (4) अनुभव

129. स्थायी आदेश क्रं. 3/2011, दि. 4 मे, 2011, अन्वये पूर्व परीक्षेचा निकाल तयार करताना भरावयाच्या एकूण पदाच्या सर्वसाधारण किती पट उमेदवार उपलब्ध होतील त्या प्रमाणे गुणांची सीमा रेषा निश्चित केली जाते.
(1) 10 पट (2) 12 पट (3) 15 पट (4) 20 पट

130. मागासवर्गीयांकरिता शासकीय व निमशासकीय सेवेमध्ये आरक्षण व शैक्षणिक सवलतीसाठी क्रिमीलेअरचे निकष कोणत्या वर्षी निश्चित करण्यात आले ?
(1) 1993 (2) 1994 (3) 1995 (4) 1996

131. आयोगाचा वार्षिक अहवाल कोणाकडे सादर केला जातो ?
(1) राज्याचे मुख्यमंत्री (2) राज्याचे राज्यपाल
(3) विधानसभा अध्यक्ष (4) राष्ट्रपती

132. आयोगाच्या वार्षिक अहवालासाठी खालीलपैकी कोणता कालावधी विचारात घेतला जातो ?
(1) 1 जाने. ते 30 जून (2) 1 एप्रिल ते 31 मार्च
(3) 1 जाने. ते 31 डिसें. (4) 1 जुलै ते 31 मार्च

कच्च्या कामासाठी जागा



www.StudentBounty.com

StudentBounty.com

**133.** एखाद्या पदाच्या सेवा प्रवेश नियमात वयोमर्यादा गणण्याची तरतूद नसलयास मुंबई नागरी सेवा वर्गी[illegible] प्रवेश नियमातील कोणत्या नियमानुसार कार्यवाही केली जाते ?

(1) नियम क्र. 7 खालील नोट 2 (2) नियम क्र. 7 खालील नोट 3
(3) नियम क्र. 7 खालील नोट 3 (ए) (4) नियम क्र. 7 खालील नोट 3 (बी)

---

**134.** सरळसेवा भरतीने भरावयाच्या पदांमधून मागासवर्गीयाकरिता आरक्षित जागा भरण्याकरिता पुरेशा प्रमाणात उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यांचेकरिता अनुभवाची अट शिथिल करून पदे भरण्याची तरतूद सेवा प्रवेश नियमामध्ये विहीत करण्यान आली असल्यास आयोगाकडून किती टक्कयापर्यंत अनुभव शिथिल केला जातो ?

(1) 20% (2) 30% (3) 40% (4) 50%

---

**135.** शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थामधील सेवांमध्ये महिलांकरिता 30% जागा आरक्षित ठेवण्याबाबतच्या दि. 25/5/2001 च्या शासन निर्णयानुसार भरतीच्या वर्षात मागासवर्गीय महिलांकरिता आरक्षित पदांसाठी त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर

(1) महिलांसाठी आरक्षित पदांचा अनुशेष पुढे ओढण्यात येईल
(2) ती पदे त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारामार्फत भरण्यात येतील
(3) ती पदे खुल्या प्रवर्गातील उमेदवारांमधून भरण्यान येतील
(4) ती पदे खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांमधून भरण्यान येतील

---

**136.** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्या करीता उमेदवारांच्या मदतीसाठी आयोगाने महाराष्ट्रतील तालूका स्तरावर व विविध प्रमुख शहरामधे किती ऑनलाईन अर्ज स्वीकृति केंद्रे निश्चित केली आहेत ?

(1) 1400 (2) 1500 (3) 1600 (4) 1800

---

**137.** ऑनलाईन अर्ज स्वीकृति केंद्राची मदत घेणाऱ्या उमेदवारांना सर्व्हिस चार्जेस म्हणून रोखीने किती रक्कम परीक्षा शुल्का व्यतिरीक्त केंद्र चालकास द्यावी लागेल ?

(1) रु. 21 (2) रु. 22 (3) रु. 23 (4) रु. 24

---

**138.** आयोगाने सहायक (पूर्व) परीक्षा – 2011 ची जाहिरात दि. 20 जूलै 2011 रोजी प्रसिद्ध केली आहे. प्रचलित नियमानुसार उमेदवाराची वयाची गणना कुठल्या तारखेस करण्यात येईल ?

(1) 1 ऑगस्ट, 2011 (2) 1 सप्टेंबर, 2011
(3) 1 ऑक्टोबर, 2011 (4) 1 नोव्हेंबर, 2011

---

**139.** आयोगाने प्रसिद्ध केलेल्या पोलीस उपनिरीक्षक पूर्व परीक्षा – 2011 च्या जाहिरातीनुसार मागासवर्गीय उमेदवाराना वयात किती सवलत देण्यात आली आहे ?

(1) 1 वर्ष (2) 2 वर्ष (3) 3 वर्ष (4) 4 वर्ष

---

**140.** पोलीस उपनिरीक्षक पदाकरीता शारीरीक चाचणी घेण्यात येते. त्या शारीरीक चाचणी मधे महिलांसाठी कुठली शारीरीक चाचणी घेतली जात नाही ?

(1) 3 कि. मि. चालणे (2) 200 मि. धावणे
(3) 8 पुल अप्स काढणे (4) गोळा फेक

---

**141.** स्पर्धा परीक्षेद्वारे पोलीस उपनिरीक्षक पदाच्या दि. 5 मे 2011 रोजी प्रसिद्ध जाहिरातीनुसार या पदासाठी निश्चित करण्यात आलेली कमाल वयोमर्यादा किती आहे ?

(1) अमागास उमेदवारांसाठी 33 वर्षे आणी मागासवर्गीयांसाठी 38 वर्षे
(2) अमागास उमेदवारांसाठी 28 वर्षे आणि मागासवर्गीयांसाठी 31 वर्षे
(3) अमागास उमेदवारांसाठी 30 वर्षे आणि मागासवर्गीयांसाठी 31 वर्षे
(4) अमागास वर्गीयांसाठी 30 वर्षे आणि मागासवर्गीयांसाठी 35 वर्षे

---

**142.** बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमातील ग्रेड अ (2) आणि त्यावरील श्रेणीच्या पदावरील नेमणूकांबाबत या उपक्रमास बृहन्मुंबई महानगर पालिका अधिनियमाच्या कोणत्या कलमानुसार सल्ला दिला जातो ?

(1) कलम 70 (2) कलम 80(अ) (3) कलम 70(अ) (4) कलम 80(ब)

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**143.** स्पर्धा परीक्षेसाठी एखाद्या कर्मचाऱ्याने आयोगाकडे अर्ज सादर केल्याची माहिती प्राप्त झाल्यावर कार्यालयाची काय जबाबदारी निश्चित केलेली आहे ?

(1) कर्मचाऱ्याचा अर्ज विचारात घ्यावा किंवा घेऊन नये याबाबत आयोगास कळविण्याची जबाबदारी असते

(2) आयोगास काही कळविण्यायाची जबाबदारी नसते

(3) ना हरकत प्रमाणपत्र आयोगास पाठविण्याची जबाबदारी असते

(4) अशा कर्मचाऱ्याच्या उमेदवारीस हरकत असेल तरच त्याने तसे 30 दिवसाच्या आत आयोगास कळाविणे बंधनकारक आहे

---

**144.** सरळसेवा प्रवेशाने भरती करण्याकरिता शासनाने आयोगास मागणीपत्र पाठविताना त्यामध्ये खाली बाबी कळविल्या आहेत व त्याच्या प्रती मागणी पत्रासोबत पाठविल्या आहेत. त्यातील कोणत्या चुकीच्या बाबी मुळे (त्रुटीमुळे) आयोगास जाहिरात देणे शक्य होणार नाही ?

(1) आरक्षण 52% पेक्षा जास्त नाही

(2) नियमानुसार अपंग, महिला व खेळाडु आरक्षण समांतर पद्धतीने वर्गवारीनिहाय दर्शविले आहे

(3) प्रारूप सेवा प्रवेश नियमाची (Draft RR) प्रत पाठविली आहे

(4) सामाजिक आरक्षण स्वतंत्रपणे दर्शविले आहे

---

**145.** ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज मागविण्याच्या पद्धतीमध्ये उमेदवारांकडून परीक्षेची फी कशाप्रकारे जमा केली जाते ?

(1) रोखीने (2) कोर्ट फि स्टॅम्पस् (CFS) च्या स्वरूपात

(3) भारतीय स्टेट बँकेमार्फत चलनाद्वारे (4) भारतीय पोस्टल ऑर्डरद्वारे

---

**146.** आयोगाकडे मान्यतेसाठी सादर केली जाणाऱ्या प्रकरणावर निर्देशन (Marking) कोणत्या क्रमाने करण्याची पद्धती आहे ?

(1) असा कोणताही क्रम निश्चित नाही

(2) प्रथम अध्यक्ष त्यानंतर जेष्ठतेनुसार सदस्य

(3) प्रथम अध्यक्ष त्यानंतर सदस्य

(4) कनिष्ठ सदस्याकडून जेष्ठ सदस्य आणि त्यानंतर अध्यक्ष

---

**147.** वार्षिक अहवालासाठी कोणता कालावधी विचारात घेण्यात येतो ?

(1) 1 एप्रिल ते 31 मार्च (2) 1 मार्च ते 30 एप्रिल

(3) 1 जानेवारी ते 31 डिसेंबर (4) 1 जून ते 31 जुलै

---

**148.** टिप्पणीलेखन करताना खालीलपैकी कोणती बाब टिप्पणीलेखनात टाळणे आवश्यक आहे ?

(1) टिप्पणी थोडक्यात व मुद्देसूद तिहावी

(2) टिप्पणीमध्ये घटनांचा उल्लेख कालानुक्रमे करावा

(3) भारदस्त, अलंकारिक भाषा व निबंधासारखी शैली असावी

(4) टिप्पणी सहानुभूतिपूर्वक पण नि:पक्षपातीपणे लिहावी

---

**149.** वार्षिक अहवाल सादर करण्याचे उद्दीष्ट काय ?

(1) आयोगाने वर्षभरात किती काम केले हे पाहणे

(2) आयोगाने वर्षभरात किती सल्ले दिले हे पाहणे

(3) शासनाने आयोगाचे किती सल्ले स्वीकारले हे पाहणे

(4) शासनाने आयोगाचे सल्ले स्वीकारले/न स्वीकारले त्याचे कारण, स्पष्टीकरणासह लोकप्रतिनिधींना तपासण्याकरीता या अहवालामुळे उपलब्ध होते व त्यामुळे आयोग व शासन दोन्हीवर त्यांचा अंकूश राहतो

---

**150.** भारतीय संविधानाच्या कुठल्या अनुच्छेदानुसार आयोगाकडे कामकाज सोपविण्यात आले ?

(1) अनुच्छेद 320 (2) अनुच्छेद 321

(3) अनुच्छेद 322 (4) अनुच्छेद 323

---

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

## सूचना – (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत: बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग – 1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

### नमुना प्रश्न

प्रश्न क्र. 201. सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव **खालीलप्रमाणे** प्र. क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र.क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा**

SEAL

www.StudentBounty.com